www.sgbauonline.com

**AU–2009**

# B.A. (Part-III) Examination

## (Optional Subject)

## RASHTRASANT TUKDOJI THOUGHT (New)

वेळ—तीन तास] [एकूण गुण—100

**सूचना** :—(1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.

(2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

(3) प्रश्न क्र. **2** मधील सर्व बहुपर्यायी प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

1. 'आधुनिक शहरीकरण प्रक्रियेची झळ ग्रामीण जनजीवनाला विस्कटून टाकणारी आहे'—या विधानाची साधक बाधक चर्चा करा. 20

किंवा

स्वातंत्र्यपूर्व ग्रामव्यवस्था आणि स्वातंत्र्योत्तर ग्रामव्यवस्था यांतील फरक स्पष्ट करा.

2. योग्य पर्याय निवडा : 20

(1) 'हॉटेली खाणे, मसणा जाणे'। ऐसे बोलती शहणे। त्यावरी नाना तिखट व्यसने। ______ सारखी।।

(अ) भूता खेता (ब) आग्या वेताळा

(क) चांडाळा (ड) मूर्खा

(2) ग्राम संपत्तीच्या रक्षणासाठी तुकडोजींनी ______ ची गरज सांगितली.

(अ) ग्रामसेना (ब) ग्रामरक्षक दल

(क) होमगार्ड (ड) पोलीस

(3) करविती नवस सायास थोर। देवी पूजेचा जोर सोर रेडे, बकरे, कोंबडे, ______। कापिताति अज्ञाने।।

(अ) डुक्कर (ब) वासरू

(क) पामर (ड) बोकड



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

(4) जीवन निरोगी होण्यासाठी ______ दिनचर्येची आवश्यकता आहे.

(अ) कार्यमग्न (ब) आरामदायी

(क) सात्त्विक (ड) ठराविक

(5) शुद्ध ______ अन्न घेतले। त्याने सात्त्विक विचार प्रवर्तले।।

(अ) सात्त्विक (ब) मधुर

(क) चवदार (ड) राजस

(6) कोणती हवा प्राणीमात्रांस सदासर्वदा आरोग्यदायी असते ?

(अ) प्रात:काळची (ब) दुपारची

(क) संध्याकाळची (ड) रात्रीची

(7) गावाची उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी कोणती व्यवस्था करावी ?

(अ) श्रमनिष्ठेचा प्रचार (ब) शेतीची सुधारणा

(क) शहराकडे वाटचाल (ड) धर्म प्रचार

(8) श्रमातूनचि उपजे ______। निजणारे तिची हानि करिती।।

(अ) भाग्य संपत्ति (ब) माणिक मोती

(क) दिव्य ज्योती (ड) अन्न धान्य

(9) जीवनातील आपदा दूर करण्यासाठी सर्व स्त्री-पुरुषांनी कोणता छंद जोपासावा ?

(अ) ललित कला (ब) जोडधंदा

(क) पाक कला (ड) गिर्यारोहण

(10) एकदा रात्रभरि जागला। मग सकाळी उठणेचि कशाला ?। आळसात सर्व ______ गेला। नियम मोडोनि।।

(अ) वेळ (ब) दिवस

(क) मास (ड) काळ



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

3. खालीलपैकी लघूत्तरी प्रश्नांचा कोणताही एक गट सोडवा : 20

'गट-अ'

(1) भारतीय कृषी परंपरा राष्ट्रसंतांच्या विचाराद्वारे स्पष्ट करा.

(2) राष्ट्रसंतांची कृषी समृद्धी विषयक भूमिका स्पष्ट करा.

(3) खते व पशुसुधार याबाबत राष्ट्रसंतांची प्रयोगशिलता उलगडून दाखवा.

(4) ग्रामोद्योगातून ग्रामाची स्वयंपूर्णता कशी राखल्या जाते ? स्पष्ट करा.

'गट-ब'

(1) कृषी व कृषीपूरक उद्योगाबाबतची राष्ट्रसंतांची भूमिका स्पष्ट करा.

(2) कच्चा माल व प्रक्रिया उद्योगाबाबत राष्ट्रसंतांची भूमिका स्पष्ट करा.

(3) सहकारी भांडार व बाजारपेठेतील गतिविधींच्या संदर्भात राष्ट्रसंतांचे विचार स्पष्ट करा.

(4) शेतीला आवश्यक आधुनिक उपकरणांचे संशोधन व उपयोजन या संदर्भातील राष्ट्रसंतांची भूमिका स्पष्ट करा.

4. खालीलपैकी कोणताही एक गट सोडवा : 20

'गट-अ'

(1) 'ग्रामनिर्माण कलेच्या अनुरोधाने ग्रामसंघटन आवश्यक आहे.' या विधानाची समर्पकता पटवून द्या.

(2) आदर्श ग्रामरचना विषयक राष्ट्रसंतांची भूमिका स्पष्ट करा.

(3) ग्रामरक्षण दलाकडे संरक्षणाची कोणकोणती जबाबदारी राष्ट्रसंतांनी दिली आहे ?

(4) न्याय व्यवस्थेच्या संदर्भात राष्ट्रसंतांचे विचार स्पष्ट करा.

'गट-ब'

(1) ग्रामशुद्धीसोबतच परस्पर सहकार्य भावना वाढीस लागण्यासाठी राष्ट्रसंतांनी 'रामधून' प्रदक्षिणेचे महत्व कसे स्पष्ट केले ?

(2) राष्ट्रसंतांची ग्राम आरोग्य विषयक भूमिका स्पष्ट करा.

(3) गोवंश सुधारणेची आवश्यकता व उपाय राष्ट्रसंतांच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे रेखाटा.

(4) ग्रामकुटुंब योजनेच्या अनुरोधाने ग्रामरचनेचे स्वरूप स्पष्ट करा.

5. महात्मा जोतीराव फुले यांचे शिक्षण विषयक विचार व राष्ट्रसंतांच्या जीवन-शिक्षण विषयक विचारांची सविस्तर चर्चा करा. 20

किंवा

'समाज व्यवस्थे संदर्भात महातमा गांधीजींचे विचार राष्ट्रसंतांच्या विचारांशी समसमान आहेत' – या विधानाचा परामर्श घ्या.



www.sgbauonline.com